RNI No. MAHBIL /2009/31743

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग चार-ब

वर्ष ९, अंक २] गुरुवार ते बुधवार, एप्रिल १३-१९, २०२३/ चैत्र २३-२९, शके १९४५ [पृष्ठे ८, किंमत : रुपये २०.००

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० एप्रिल २०२३.

अधिसूचना

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१.

क्रमांक आयडीसी २०१४/(प्र.क्र. २४९)/उ- १४.—महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. तीन) चे कलम १ पोट-कलम (३) अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे यासोबत जोडण्यात आलेले अनुसुचित उल्लेखलेल्या मौजे पाटस, तालुका दौंड, जिल्हा पुणे येथील क्षेत्रात अधिनियमाचे प्रकरण ६ च्या तारखेस अंमलात येईल ती तारीख ११ एप्रिल २०२३ म्हणून नियुक्त करीत आहे व उक्त क्षेत्र हे उक्त अधिनियमाच्या कलम २ खंड (ग) अन्वये औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर करीत आहे.

उक्त क्षेत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, म. औ. वि. महामंडळ, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३ आणि उप विभागीय अधिकारी, दौंड-पुरंदर, उप विभाग पुरंदर (सासवड), जिल्हा पुणे यांचे कार्यालयात ठेवलेल्या नकाशात लाल रंगाने जास्त स्पष्टपणे दाखविले आहे आणि सोबतच्या अनुसूचित दर्शविल्याप्रमाणे चतुःसीमा आहेत :—

अनुसूची

मौजे पाटस, तालुका दौंड, जिल्हा पुणे

अ.क्र.	गट नंबर	क्षेत्र (हे. आर)
१	१३४/१ पै	०.३६००
२	१३५ पै.	०.६१००
३	१३६ पै.	०.३९००
	एकूण	**१.३६००**

चतु:सिमा.—

उत्तरेस : अतिरिक्त कुरकुंभ (पाटस) औद्योगिक क्षेत्राची हद्द.

दक्षिणेस : पुणे- सोलापूर राष्ट्रीय महामार्ग.

पूर्वेस : कुरकुंभ औद्योगिक क्षेत्राची हद्द.

पश्चिमेस : मौजे पाटस गट नंबर १३४/१ पैकी, १३५ पैकी, १३६ पैकी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

किरण जाधव,
शासनाचे अवर सचिव.

INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,

Mumbai 400 032, dated the 10th April 2023.

NOTIFICATION

Maharashtra Industrial Development Act, 1961.

No. IDC 2014/(C.R. 249)/Ind 14.—In exercise of the powers conferred by sub-section (*3*) of Section 1 of the Maharashtra Industrial Development Act, 1961 (Mah. III of 1962), the Government of Maharashtra hereby appoints 11th April, 2023 to be the date from which the provisions Chapter VI of the said Act shall take effect in certain areas of Village Patas in Taluka Daund of District Pune mentioned in the Schedule appended hereto and declares the said area to be an industrial area under clause (*g*) of section 2 of the said Act, for the purposes of the said Act.

The said area is more clearly defined in red in the map deposited in the offices of the Chief Executive Officer, Maharashtra Industrial Development Corporation, Andheri (East), Mumbai 400 093 and Sub-Divisional Officer Daund- Purandar, Sub-Divison Purandar (Saswad), Dist. Pune and is bounded by the area as indicated in the said schedule :—

Schedule

Village Patas, Taluka Daund, District Pune

Sr. No.	Gat No.	Area (Hectare Are)
1	134/1 Pt.	0.3600
2	135 Pt.	0.6100
3	136 Pt.	0.3900
	Total	**1.3600**

Boundaries.—

On the North by : Boundary of Addl. Kurkumbh (Patas) Industrial Area.

On the South by : Pune- Solapur National Highway.

On the East by : Boundary of Kurkumbh Industrial Area.

On the West by : Village Patas Gat No. 134/1 Pt., 135Pt, 136Pt.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KIRAN JADHAV,
Under Secretary to Government.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० एप्रिल २०२३.

अधिसूचना

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१.

क्रमांक आयडीसी २०१९ /(प्र.क्र. ३५८)/उ-१४.—महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. तीन) चे कलम १ पोट-कलम (३) अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे या सोबत जोडण्यात आलेले अनुसूचित उल्लेखिलेल्या मौजे धामणी, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथील क्षेत्रात अधिनियमाचे प्रकरण ६ च्या तारखेस अंमलात येईल ती तारीख ११ एप्रिल, २०२३ म्हणून नियुक्त करीत आहे व उक्त क्षेत्र हे उक्त अधिनियमाच्या कलम २ खंड (ग) अन्वये औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर करीत आहे.

उक्त क्षेत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, म. औ. वि. महामंडळ, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३ आणि उपविभागीय अधिकारी, कर्जत, तालुका खालापूर, जिल्हा रायगड यांच्या कार्यालयात ठेवलेल्या नकाशात लाल रंगाने जास्त स्पष्टपणे दाखविले आहे आणि सोबतच्या अनुसुचित दर्शविल्याप्रमाणे चतुःसिमा आहेत :—

अनुसूची

मौजे धामणी, तालुका खालापूर, जिल्हा रायगड

अ.क्र.	सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर	क्षेत्र (हे. आर)
१	३८/१	०.३११६
एकूण		**०.३११६**

चतुःसिमा.—

उत्तरेस : सर्व्हे नंबर ३९.

दक्षिणेस : सर्व्हे नंबर ३७.

पूर्वेस : सर्व्हे नंबर ३८/२ व ३८/३.

पश्चिमेस : पाताळगंगा नदी

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

किरण जाधव,
शासनाचे अवर सचिव.

INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,

Mumbai 400 032, dated the 10th April 2023.

NOTIFICATION

Maharashtra Industrial Development Act, 1961.

No. IDC 2019/(C.R. 358)/Ind 14.—In exercise of the powers conferred by sub-section (*3*) of section 1 of the Maharashtra Industrial Development Act, 1961 (Mah. III of 1962), the Government of Maharashtra hereby appoints 11th April, 2023 to be the date from which the provisions Chapter VI of the said Act shall take effect in certain areas of Village Dhamni, Taluka Khalapur of District Raigad mentioned in the Schedule appended hereto and declares the said area to be an industrial area under clause (g) of section 2 of the said Act, for the purposes of the said Act.

The said area is more clearly defined in red in the map deposited in the offices of the Chief Executive Officer, Maharashtra Industrial Development Corporation, Andheri (East), Mumbai 400 093 and Sub Divisional Officer, Karjat, Taluka Khalapur, District Raigad is bounded by the area as indicated in the said schedule :—

Schedule

Village Dhamni, Taluka: Khalapur, District: Raigad

Sr. No.	Survey No./ Hissa No.	Area (Hectare Are)
1	38/1	0.3116
Total		**0.3116**

Boundaries.—

On the North by : Survey No. 39.

On the South by : Survey No. 37.

On the East by : Survey No. 38/2 and 38/3.

On the West by : Patalganga River.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KIRAN JADHAV,
Under Secretary to Government.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० एप्रिल २०२३.

अधिसूचना

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१.

क्रमांक आयडीसी-२०२३/५५/उद्योग-१४.—महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ च्या महाराष्ट्र अधिनियम तीन) चे कलम खंड २, (ग) अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे या सोबत जोडण्यात आलेले अनुसूचीत उल्लेखलेले मौजे - हाटमोहिदे, ता. जि. नंदुरबार येथील क्षेत्रास दिनांक ११ एप्रिल २०२३ पासून औद्योगिक क्षेत्र जाहीर करीत आहे :—

अनुसूची

मौजे - हाटमोहिदे, ता. नंदुरबार, जि. नंदुरबार

अ. क्र.	गट नंबर	एकूण क्षेत्र (हे. आर)
१	३१२/२ पैकी	०.२७
एकूण		**०.२७**

चतु:सिमा.—

उत्तरेस : तापी नदी.

दक्षिणेस : रस्ता

पूर्वेस : मौजे हाटमोहिदे येथील नट नं. ३१२/२ पैकी क्षेत्र

पश्चिमेस : मौजे हाटमोहिदे येथील नट नं. ३१२/१ पैकी क्षेत्र

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

किरण जाधव,
शासनाचे अवर सचिव.

INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,

Mumbai 400 032, dated the 10th April 2023.

NOTIFICATION

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT ACT, 1961.

No.IDC -2023/55/IND-14.—In exercise of the powers conferred by clause (*g*) of section 2 of the Maharashtra Industrial Development Act, 1961(Mah. III of 1962) the Government of Maharashtra hereby declares, with effect from the 11th April 2023, the certain areas of Village-Hatmohide, Tal. Nandurbar, Dist.Nandurbar mentioned in the Schedule appended here to an Industrial area for the purposes of the said Act :—

Schedule

Village Hatmohide, Tal. Nandurbar, Dist. Nandurbar

Sr. No.	Gat No.	Area (Hectare Are)
1	312/2 Part	0.27
Total		**0.27**

Boundaries.—

On the North by : Tapi River

On the South by : Road

On the East by : Village-Hatmohide Gut No. 312/2 Part

On the West by : Village-Hatmohide Gut No. 312/1 Part

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KIRAN JADHAV,
Under Secretary to Government.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ एप्रिल, २०२३

आदेश

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ आणि नियम १९६७.

क्रमांक कृबास ०४२२/प्र.क्र.२२१/२१स.—ज्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समिती, मुखेड, ता. मुखेड, जि. नांदेड या बाजार समितीच्या संचालक मंडळाची नियमित ५ वर्षाची मुदत दिनांक २५ मे २०२२ रोजी संपुष्टात आली आहे ;

ज्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समिती, मुखेड, ता. मुखेड, जि. नांदेड या बाजार समितीच्या संचालक मंडळास दिनांक ८ जुलै २०२२ च्या शासन आदेशानुसार देण्यात आलेली मुदतवाढ दिनांक २५ नोव्हेंबर २०२२ रोजी संपुष्टात आली आहे ;

ज्याअर्थी, जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, नांदेड यांनी दिनांक २८ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या आदेशानुसार कृषि उत्पन्न बाजार समिती, मुखेड, जिल्हा नांदेड या बाजार समितीवर दैनंदिन व प्रशासकीय कामकाज पार पाडण्यासाठी प्रशासकाची नियुक्ती केली आहे ;

ज्याअर्थी, पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.पणन-५/कृउबास मुखेड /संचा.मं.मुदतवाढ/२०२२/५३२३, दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ अन्वये मुदतवाढ देणेबाबत प्रस्तावित केले आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम १४(३) च्या दुसऱ्या परंतुकानुसार, पूर्वोक्तानुसार सदस्यांचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी समितीच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या कारणामुळे समितीच्या सदस्यांची सर्वसाधारण निवडणूक घेणे शक्य नाही तर, राज्य शासनास **शासकीय राजपत्रातील** आदेशाद्वारे वेळोवेळी कोणत्याही अशा समितीचा पदावधी वाढवता येईल, मात्र अशा प्रकारे वाढविण्यात आलेला पदावधी एकंदर कालावधी एक वर्षाहून अधिक असणार नाही, अशी तरतूद आहे ;

ज्याअर्थी, वर नमूद केलेले कारण लक्षात घेता कृषि उत्पन्न बाजार समिती, मुखेड, जिल्हा नांदेड या बाजार समितीच्या संचालक मंडळास मुदतवाढ देणे योग्य राहील, अशी शासनाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समिती, मुखेड, जिल्हा नांदेड या बाजार समितीवरील प्रशासकाची नियुक्ती रद्द करून प्रशासक नियुक्ती पूर्वी कार्यरत असलेल्या संचालक मंडळास पुनर्स्थापित करून महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ कलम १४(३) नुसार शासनास प्राप्त अधिकारांचा वापर करून कृषि उत्पन्न बाजार समिती, मुखेड, ता. मुखेड, जि. नांदेड या बाजार समितीच्या पुनर्स्थापित संचालक मंडळास दिनांक ११ एप्रिल २०२३ पासून सहा महिने किंवा निवडणुका होऊन नवीन संचालक मंडळ प्रस्थापित होईल, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्यास या आदेशाद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ कलम १४(३) मधील तरतुदीनुसार संचालक मंडळाची एकूण मुदतवाढ एक वर्षापेक्षा जास्त होणार नाही, याची दक्षता संबंधित जिल्हा उप निबंधक, यांनी घ्यावी. सदर मुदतवाढीच्या कालावधीत शासन आदेश क्र.कृबास-०१२०/प्र.क्र.१९/२१-स, दिनांक १९ एप्रिल २०२२ मधील खालील तरतुदी लागू राहतील :—

१. सदर वाढीव मुदतीच्या कालावधीत संचालक मंडळाची निवडणूक घेण्याबाबत आणि प्रत्यक्ष संचालक मंडळ कार्यरत करण्यासाठी संबंधित कार्यरत संचालक व जिल्हा उप निबंधक यांनी निवडणूक निर्णय अधिकारी आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांना आवश्यक सहकार्य करावे.

२. सदर कालावधीत संचालक मंडळ यांना कोणताही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही.

३. तथापि, काही विशिष्ट अपवादात्मक परिस्थितीत धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा झाल्यास शासनाची पूर्व मान्यता घेण्यात यावी. त्याबाबत संबंधित संचालक मंडळ यांनी परिपूर्ण प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डॉ. सुग्रीव सं. धपाटे,
शासनाचे सहसचिव (पणन).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.